**मुख्य कार्यालय, विरार**
**विरार (प),**
**ता. वसई, जि. पालघर, पिन 401 303.**

दुरध्वनी : 0250-2525105/06/2529888/2529890
फॅक्स : 0250-2525107
ई-मेल : vasaivirarcorporation@yahoo.com

**जावक क्र. : व.वि.श.म./ /**
**दि.२७/०४/२०२६**

**वसई-विरार शहर महानगरपालिका**

## वसई-विरारमधील पावसाळ्यात उद्भवणाऱ्या पूर परिस्थितीवरील उपाय योजनेसाठी मा.महापौरांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने घेतली कोकण विभागीय आयुक्तांची भेट

वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रात पावसाळ्यात उद्भवणाऱ्या पूर परिस्थितीवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी दि.२७ एप्रिल २०२६ रोजी माननीय महापौर श्री.अजीव पाटील यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने कोकण भवन येथे मा.विभागीय आयुक्त, कोकण यांची भेट घेतली. या भेटीत शहराच्या भौगोलिक आव्हानांवर चर्चा करून तातडीने उपाययोजना करण्याची मागणी करण्यात आली.

भेटीदरम्यान माननीय महापौर श्री.अजीव पाटील आणि शिष्टमंडळाने विभागीय आयुक्तांचे लक्ष विविध महत्त्वाच्या मुद्द्यांकडे वेधले. यामध्ये वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रात पावसाळ्यात निर्माण होणारी पूर परिस्थिती नियंत्रित करण्यासाठी 'केंद्रीय जल आयोग' (CWC) च्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार तातडीने कार्यवाही करण्यात यावी. तसेच ठाणे, कळवा आणि वसई खाडी पात्रात मोठ्या प्रमाणावर साचलेल्या गाळामुळे पाण्याचा निचरा होण्यास अडथळा निर्माण होतो. हा गाळ तातडीने काढून पात्राची खोली वाढवण्याची त्याचप्रमाणे कळवा खाडीपात्रालगत झालेली अनधिकृत अतिक्रमणे पूरनियंत्रणाच्या दृष्टीने प्राधान्याने हटवण्यात यावीत अशी मागणी करण्यात आली. केवळ तात्पुरत्या दुरुस्त्या न करता, दरवर्षी उद्भवणाऱ्या या संकटावर दीर्घकालीन आणि ठोस तांत्रिक उपाययोजना करण्यात याव्यात अशीही मागणी यावेळी करण्यात आली.

शिष्टमंडळाने मांडलेल्या समस्यांचे गांभीर्य लक्षात घेऊन माननीय विभागीय आयुक्तांनी या विषयांवर सकारात्मक प्रतिसाद दिला. पावसाळा सुरू होण्यापूर्वी आवश्यक त्या प्रशासकीय हालचाली करून आणि संबंधित विभागांशी समन्वय साधून या मागण्यांवर योग्य तो निर्णय घेतला जाईल, असे आश्वासन त्यांनी यावेळी दिले.

यावेळी भेटीवेळी मा.महापौर महोदयांसोबत माजी महापौर श्री. नारायण मानकर, स्थायी समिती सभापती श्री.प्रवीण शेट्टी व इतर पदाधिकारी उपस्थित होते.

"वसई-विरारमधील नागरिकांना पावसाळ्यात पुराचा फटका बसू नये, ही आमची प्राथमिकता आहे. खाडीतील गाळ काढणे आणि CWC च्या नियमांनुसार काम करणे यावर आम्ही ठाम आहोत."

_श्री.अजीव पाटील

(महापौर, वसई विरार शहर महानगरपालिका)